**प्रेस नोट** दिनांक :– ११/०४/२०२२

**जिल्हा सामन्य रुग्णालय, ठाणे येथील लोकसेवक श्री. जगन पांडुरंग दिनकर, वय–५० वर्षे, कनिष्ठ लिपीक (वर्ग–३), यांस लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. जगन पांडुरंग दिनकर, वय–५० वर्षे, कनिष्ठ लिपीक (वर्ग–३), जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १,०५,०००/– रुपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | पहिला हप्ता २०,०००/– रुपये. |
| थोडक्यात हकिकत | दिनांक ०७/०४/२०२२ रोजी वरील नमूद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांचे प्रलंबित कालबध्द पदोन्नतीचे बिलाची बाकी राहिलेली रक्कम देण्यासाठी त्यांचेकडून १,०५,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली असलेबाबत लेखी तक्रार दिली होती.<br>त्या अनुषंगाने दिनांक ०८/०४/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित कालबध्द पदोन्नतीचे बिलाची बाकी, राहिलेली रक्कम देण्यासाठी, त्यांचेकडून १,०५,०००/– रुपये लाचेच्या रकमेची मागणी करुन, तडजोडीअंती ६०,०००/– रुपये लाचेच्या रकमेची मागणी करुन, त्यातील पहिला हप्ता २०,०००/– रूपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीअंती निष्पन्न झाले.<br>त्या अनुषंगाने आज दिनांक ११/०४/२०२२ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता, आंबेडकर रोड, रॉयल तडका हॉटेलमध्ये लोकसेवक जगन दिनकर यांनी स्वत: तक्रारदार यांचेकडून २०,०००/– रु. लाचेच्या रकमेचा स्विकार केला असता, त्यांना १३:४२ वा. ला.प्र.वि., ठाणे पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी:–मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले सो.,पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि,ठाणे परिक्षेत्र,ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता** :– ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१.
**संकेतस्थळ** :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
**ई–मेल** :– spacbthane@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार**
**ॲप्लीकेशन** :– acbmaharashtra.net
**टोल फ्री नंबर** :– १०६४.
**दुरध्वनी क्रमांक** :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९.
**व्हॉटस् ॲप क्रमांक** :– ९९३०९९७७००.

(मनोजकुमार प्रजापती)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे